# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/02/2024 (सोमवार) सकाळ

---

### कुही येथील जुगार अड्ड्यावर विशेष पथकाची धाड

दि. ०४/०२/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक सा. यांचे विशेष पथक हे पो.स्टे. कुही परीसरात खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीता फिरत असताना विश्वसनीय मुखबीरद्वारे खबर मिळाली की, ओपी पाचगाव हद्दीत मौजा टाकळी शिवारात असलेल्या रोडला लागुन सार्वजनिक ठिकाणी लिंबाच्या झाडाखाली काही लोक पैश्याची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहेत. अश्या माहितीवरून सदर घटनास्थळी जावुन रेड केली असता **आरोपी नामे – १) सल्लाउद्दीन यासुद्दीन, वय ४२ वर्ष रा. मोमीनपुरा बड़ी मस्जीद जवळ नागपूर २) वचन दादारावजी राउत वय ३७ वर्ष, रा. जुनी विडीपेठ डॉक्टर बोचला जवळ नागपूर ३) दिलीप गौतम वहाणे, वय ४३ वर्ष, न्यु बिडीपेठ धांड़े किराणा स्टोअर्स जवळ नागपूर ४) मुजीब अहमद जमीर अहमद वय ४० वर्ष, रा. मोमीन पुरा बडी मस्जीद जवळ नागपूर ५) जितु जागोबाजी दगड़े, वय ४५ वर्ष, रा. भांडेप्लॉट चौक नागपूर** हे तासपत्त्यांवर पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन नगदी ४०,३७०/–रू. ५२ तासपत्ते असा एकुण ४०,४२०/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी क्र. १) ते ०५) यांच्या विरूद्ध पोस्टे कुही येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके, हरीहर सोनकुसरे, पोहवा हरीदास चाचरकर, चांगदेव कुथे, पोलीस अंमलदार आशिष खंडाईत, विकेश राउत, अनिल करडखेले यांनी केलेली आहे.

## पो.स्टे. अरोली येथील जुगार अड्डयावर धाड

दिनांक ०४/०२/२०२४ रोजी पोलीस स्टेशन अरोली येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना पोलीस स्टेशन अरोली येथील खंडाळा पिपरी येथे काही इसम हे पैश्याची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहेत. अशी गोपनिय माहीती प्राप्त झाले वरून पोलीस स्टाफ यांनी खंडाळा पिपरी येथे सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे– १) राजु आंनदराव खोब्रागडे वय ३१ वर्ष रा. गोवरी २) शेशराव किसन मारबते वय ५५ वर्ष रा. कोटगांव, ३) मनोज भाउराव ठवकर वय ३८वर्ष रा. कोटगांव ४) चंद्रषेखर मनोहरराव गांढबांधे वय ३७ वर्ष रा. निमखेडा ५) विक्की जगदिश मोहने वय २९ वर्ष रा. रेवराल ६) करण सिताराम बावणे वय २३ वर्ष ७) शिवकुमार हिराजी सेलोकर वय ४१ वर्ष रा. रेवराल ८) दिपक देवरावजी गोंडाणे वय ३३ वर्ष, ९) मलखाम देवचंद दादुरे वय ४५ वर्ष रा. रेवराल** हे तासपत्त्यांवर पैशाचे हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातुन जप्त नगदी ४,८००/– रु. व ४ काती किंमती ४० रु., दोन मोटारसायकल कि. ७०,०००/– रु. तसेच नगदी ३,००० रु. असा एकुण ७७,८४०/– रु. चा मुद्देमाल जप्त करून आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अरोली येथे कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण, श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात प्रभारी अरोली ठाणेदार किशोर वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक सुशिल सोनवने, पोलीस हवालदार शाम पोकळे, संदीप बाजनघाटे, पोलीस अंमलदार राकेश राउत, विकी कोसरे, रामरतन तिजारे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर